# चंद्रपूर प्रकल्प च्या संच क्र.८ (५०० मे.वॅ) चे 'कार्यान्वयन'
**(Synchronisation)**

चंद्रपूर प्रकल्प (२×५०० मे.वॅ) च्या संच क्र.८ चे ' कार्यान्वयन' (Synchronisation) दि. ११ जानेवारी २०१५ रोजी यशस्वीरीत्या करण्यात आले असून ४५ मेगा वॅट इतकी वीज निर्मिती ४६ मिनिटे करण्यात आली. महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प), श्री. चंद्रकांत थोटवे यांच्या हस्ते सकाळी ०५:४१ वाजता 'कार्यान्वयन' (Synchronisation) थेट नियंत्रण कक्षातून कळ दाबून करण्यात आले. याच बरोबर चंद्रपूर प्रकल्पाने एक अतिशय महत्वाचा टप्पा पार केला असून संच क्र. ८ मधून मार्च २०१५ पासून पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे.

चंद्रपूर प्रकल्पातील संच क्र. ९ चे काम सुध्दा वेगाने प्रगतीपथावर असून त्याचे बॉयलर प्रदीपन मार्च २०१५ मध्ये अपेक्षित आहे. चंद्रपूर प्रकल्पातील संच क्र. ८ व ९ पूर्णपणे क्रियान्वित झाल्यानंतर महानिर्मितीच्या वीज निर्मिती क्षमते मध्ये १००० मेगा वॅट. ची भर पडेल. अशा प्रकारे महानिर्मिती आपली स्थापित क्षमता वाढवित असून जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर रहात आहे.

याच बरोबर चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राची एकूण निर्मिती क्षमता ३३४० मेगा वॅट होईल.

या प्रसंगी श्री. विकास जयदेव, कार्यकारी संचालक (प्रकल्प), श्री. वसंत खोकले, मुख्य अभियंता (प्रकल्प), चंद्रपूर प्रकल्प, श्री.राजू बुरडे, मुख्य अभियंता, चंमऔविकें, चंद्रपूर, श्री. प्रदीप शिंगाडे, मुख्य अभियंता, (निर्मिती बांधकाम), कोराडी, श्री. प्रमोद नाफडे, मुख्य अभियंता (स्थापत्य बांधकाम), चंद्रपूर, श्री. संजय काशीकर, उपमुख्य अभियंता (चाचणी), कोराडी, श्री अनिल आष्टीकर, उपमुख्य अभियंता (कमीशनींग), चंद्रपूर प्रकल्प, श्री हरिदास चौधरी, मुख्य सल्लागार तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, चंमऔविकें, चंद्रपूर, श्री. अभिजित कुलकर्णी, उपमुख्य अभियंता (प्रभारी), चंद्रपूर प्रकल्प, श्री. परमानंद रंगारी, उपमुख्य अभियंता (प्रभारी), चंद्रपूर बांधकाम मंडळ, श्री. नरेन्द्र गुप्ता, सहाय्यक महाव्यवस्थापक, मे. बी.एच.ई.एल, चंद्रपूर, श्री. राजेन्द्र ऐरन, उपाध्यक्ष, मे. बी.जी.आर चंद्रपूर व चंद्रपूर प्रकल्पातील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. चंद्रकांत थोटवे / श्री. वसंत खोकले यांनी महानिर्मितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार व त्यांचे कर्मचारी यांचे अथक परिश्रमाबद्दल मन:पूर्वक आभार मानले. महानिर्मितीचे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी चंद्रपूर प्रकल्पातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे याप्रसंगी अभिनंदन केले.